नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०८/०५/२०२६ (शुक्रवार )

# पोलीस ठाणे कळमेश्वर हद्दीतील मौजा गौंडखैरी पारधीबेडा शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणाऱ्या आरोपींवर १३ गुन्हे नोंद, ०९ लाख ६३ हजार ८०० रूपयांचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :–** दिनांक ०७/०५/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील गौंडखैरी, पारधी बेडा येथे हातभट्टी लावुन मोहाफुल सडवा वापरून मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे अशा गुप्त बातमीदाराच्या खात्रीशीर बातमीवरून मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात यांच्या पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांधे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन कळमेश्वर यांच्या नेतृत्वात कळमेश्वर पोलीस आणि दंगा नियंत्रण पथक यांनी कारवाई करत मौजा गोंडखैरी पारधीबेडा शिवारात घटनास्थळावरील हातभट्टया नष्ट केल्या.

**१३ महीला आरोपी यांच्यावर कारवाई करत घटनास्थळावरून पंचासमक्ष २२,००० लिटर मोहाफुल सडवा आणि ८१५ लिटर मोहाफुल गावठी दारू, प्लॅस्टीक आणि लोखंडी ड्रम आणि इतर दारू गाळण्याचे साहित्य असा एकुण ९,६३,८००/– रूपयांचा जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद १३ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १३ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**







# नागपूर ग्रामीण जिल्हयातअंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०४ आरोपीतांविरूध्द
# एन.डी.पी.एस कायदयान्वये ०४ गुन्हे नोंद

दिनांक ०७/०५/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**रामटेक पोलीस स्टेशन** अंतर्गत पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी क्रं १) अशोक रामसुख सरोदे, वय ४५ वर्षे, रा. जि. प्रतापगढ, उत्तरप्रदेश ह.मु. निजाम भटटा, मनसर, ता.रामटेक, हा मौजा मनसर येथील स्मशान भुमी जवळ अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. आणि आरोपी क्रं २) बालकराम श्रीराम यादव, वय ३७ वर्षे, रा.वार्ड नं. ०६, चौराई, जि.छिंदवाडा, राज्य मध्यप्रदेश ह.मु. मनसर, गोपाल नगर, कांद्री माईन, ता.रामटेक, हा गहु तलाव रामटेक येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **बुटीबोरी पोलीस स्टेशन** अंतर्गत ईश्वर डमरू मसराम, वय ५६ वर्ष, रा. वार्ड क्र. ०२, मोहगांव, ता. जि. नागपुर, हा मौजा सोनेगांव शिवार धुन पंजाबी ढाबा येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पाचगाव पोलीस स्टेशन** अंतर्गत मुकेश चंद्रिकाप्रसाद पाठक, वय ४२ वर्ष, रा. भोपाल, म.प्र. ह.मु. चांपा, ता. उमरेड, हा मौज चांपा दरग्याचे मागे, सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**वर नमुद ०४ आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये ०४ गुन्हे नोंद करण्यात आले आहे**

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ३५ गुन्हे नोंद

दिनांक ०७/०५/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू काढणारे, तसेच दारू बाळगुन विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू व साहित्य असा एकुण **१०,३२,५१०/—**रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ३५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** अंतर्गत १३ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत** ०२ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन केळवद** येथे ०६ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन खापा** येथे ०२ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन काटोल येथे** ०२ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन नरखेड येथे** ०१ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन रामटेक** येथे ०१ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन मौदा** येथे ०३ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन पाचगाव** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वेलतुर** येथे ०१ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन बोरी** येथे ०२ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे ०१ गुन्हा नोंद आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) ९४४ लिटर मोहाफुल गावठी दारू २) २२००० लिटीर मोहाफुल सडवा, ३) ९००० मिली देशी दारू, ४) ३२४० मिली विदेशी दारू आणि इतर साहीत्य असा एकुण १०,३२,५१०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**